दि. 29/04/2023

म.टा.पृ.पान क्र. 1

## पोलिसांच्या जागेचा तिढा

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर



मिरा रोडमधील एक सरकारी जमीन जिल्हाधिकानी काही वर्षांपूर्वी पोलिस प्रशासनाला दिली होती. मात्र आता पालिका प्रशासनाने ही जमीन विकास आराखड्यात मैदानासाठी आरक्षित असल्याचा दावा करत, ती पालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. त्यामुळे या जागेचा तिढा निर्माण झाला आहे.

मिरा रोडच्या बेवर्ली पार्क परिसरातील राज्य सरकारच्या जागेत मिरा-भाईंदर पालिकेच्या विकास आराखड्यात मैदानासाठी आरक्षण दर्शवण्यात आले आहे. या जागेचे एकूण क्षेत्रफळ २६ हजार ६०० चौरस मीटर इतके आहे. यातील २५ हजार ५०० चौरस मीटर जागा जिल्हाधिकाऱ्यांनी पालिकेकडे हस्तांतरित केली आहे. तर उर्वरित जागा काही वर्षांपूर्वी पोलिस प्रशासनाला वापरासाठी हस्तांतरित केली आहे. या जागेत काही महिन्यांपूर्वीच पोलिसांना सरावासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

मात्र आता ही जागा आरक्षण विकसित करण्याच्या दृष्टीने पालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी पालिका प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे केली आहे. त्यामुळे आता या जागेसंदर्भात काय निर्णय घेतला जातो, याकडे लक्ष लागले आहे.

## अनधिकृत ठरलेल्या १६ शाळांवर बडगा

म. टा. वृत्तसेवा, पालघर

सरकारची मान्यता नसलेल्या १६ अनधिकृत शाळांवर पालघर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने कारवाई करून या शाळांच्या संस्थाचालकांवर पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शिक्षण विभागाच्या आयुक्तांच्या आदेशाने आणि पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. जिल्ह्यात अनेक बोगस तसेच अनधिकृत शाळा असल्याचे वृत्त 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मागील आठवड्यात प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर ही कारवाई झाली.

पालघर तालुक्यातील पाच, तर वसई तालुक्यातील ११ शाळा अशा एकूण १६ शाळांचा यामध्ये समावेश आहे. या शाळा बंद करण्याबाबत वेळोवेळी नोटिसा देण्यात आल्या होत्या. परंतु तरीही या शाळा अनधिकृतपणे सुरूच ठेवून विद्यार्थी व पालकांची फसवणूक करण्यात येत होती. त्यामुळे या शाळांवर कारवाई करण्यात आली.

अनधिकृत शाळांवर कारवाईचा बडगा सुरूच राहणार असून पालकांनी आपल्या पाल्यांना प्रवेश घेताना शहानिशा करणे गरजेचे आहे. शासनमान्यता असलेल्या शाळांमध्येच पाल्यांना प्रवेश घ्यावा, असे आवाहन पालघर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने केले आहे.

### या शाळांवर गुन्हे

- **पालघर तालुका :** सुमित्रा एज्युकेशन सोसायटी, डी. एस. मेमोरिअल इंग्लिश मीडियम स्कूल (बोईसर), लिटिल एंजल प्रायमरी स्कूल (बोईसर), मातोश्री आशादेवी विद्या मंदिर (नगर शिगाव रोड), स्वामी विवेकानंद विद्यालय (सफाळे), ज्ञानोदय विद्यामंदिर (घोंदल पाडा, केळवे रोड)
- **वसई तालुका :** स्वामी विवेकानंद, सेंट झेव्हियर अँड मेरी कॉन्व्हेंट स्कूल, कुमर मेरी पब्लिक स्कूल, शांतिनिकेतन विद्यालय, लॉर्ड्स इंग्लिश स्कूल, गॉड ब्लेस स्कूल, चिल्ड्रन वेल्फेअर स्कूल, पोल स्टार इंग्लिश स्कूल, मोहम्मदी उर्दू प्रायमरी स्कूल, शारदा निकेतन आणि शारदा विद्या मंदिर

## अनधिकृत बांधकामप्रकरणी गुन्हे

म. टा. वृत्तसेवा, वसई

वसई-विरार महापालिकेने अनधिकृत बांधकामधारकांविरोधात तीव्र मोहीम हाती घेतली आहे. एकीकडे अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात येत असून अनधिकृत फेरीवाल्यांवरही कारवाई सुरू आहे, तर दुसरीकडे अनधिकृत बांधकामधारकांवर एमआरटीपीअंतर्गत गुन्हे दाखल करण्याचे सत्र सुरू झाले आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामधारकांचे धाबे दणाणले आहे.

वसई-विरार महापालिका हद्दीतील आरक्षित जागांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे पालिकेचे अनेक प्रकल्प रखडले आहेत. विशेषतः सांडपाणी प्रक्रिया केंद्राचीदेखील रखडपट्टी झाली आहे. त्यामुळे पालिकेने अतिक्रमण हटवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तोडक कारवाई हाती घेतली आहे. मागील महिन्यात अनधिकृत बांधकामधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्याचप्रमाणे नालासोपारा येथील धानीव, पेल्हार येथील जागांवर झालेल्या अनधिकृत बांधकामांप्रकरणी पालिकेतर्फे बांधकामधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या गुन्ह्यात सर्वे क्रमांक १२५ हिस्सा क्र. ३ येथे अनधिकृत बांधकाम करण्यात आले होते. या प्रकरणी पालिकेच्या सहायक आयुक्त विशाखा मोटघरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एकूण सहा जणांविरोधात पेल्हार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या प्रकरणात पेल्हार येथील अनधिकृत बांधकामाप्रकरणी एका बांधकामधारकावर पेल्हार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरकारची कोणतीही बांधकाम परवानगी न घेता बेकायदा बांधकाम केल्याप्रकरणी हे गुन्हे दाखल करण्यात आल्याचे पालिकेचे उपायुक्त अजित मुठे यांनी सांगितले.

Scanned with CamScanner

म.टा.पु. पान क्र.1

दि. 29/04/2023

# ‘जीवना’शी खेळ

## मिरा-भाईंदरमध्ये बाटलीबंद पाण्याचा बेकायदा व्यवसाय तेजीत

**भाविक पाटील**, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमध्ये ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. याचा फायदा घेत, बाटलीबंद पाण्याची विक्री करणारे सक्रिय झाले आहेत. यासाठी सरकारच्या आवश्यक परवानग्या घेतल्या जात नाहीत. तसेच बोरिंगच्या पाण्यावर नाममात्र प्रक्रिया करून त्याची सर्रास विक्री केले जात आहे. त्यावर संबंधित कंपनीचे नाव किंवा ते भरल्याची तारीखही नमूद नसते. त्यामुळे या पाण्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नामांकित कंपन्यांच्या बाटलीबंद पाण्याच्या तुलनेत हे पाणी कमी दरात मिळत असल्याने, ग्राहक ते खरेदी करताना दिसत आहेत.

मिरा-भाईंदर शहराला मागील काही दिवसांपासून स्टेम आणि एमआयडीसीकडून मंजूर कोट्यापेक्षा कमी पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे अनेक भागांत ४० तासांहून अधिक वेळानंतर पाणीपुरवठा केला जात आहे. परिणामी, शहरात पाणीटंचाई उद्भवली आहे. याला तोंड देण्यासाठी अनेक जण बाजारातून बाटलीबंद पाणी खरेदी करत आहेत. नामांकित कंपनीच्या पाण्याची किंमत प्रति २० लिटरच्या बाटलीसाठी १२० ते दीडशे रुपयांपर्यंत आहे. त्यामुळे ते सर्वसामान्यांना परवडत नाही. तर या बेकायदा प्रकल्पांतील हेच बाटलीबंद पाणी ४० रुपयांपर्यंत मिळत आहे. त्यामुळे अनेक ग्राहक साहजिकच हे पाणी विकत घेत आहेत.

उत्तन, काशिमिरा व डाचकुल पाडा येथील अडगळीच्या ठिकाणी अशा छोटेखानी, बेकायदा पाणी प्रकल्पांत या बाटल्या भरून संपूर्ण शहरात पुरवल्या जातात. या प्रकल्पांमध्ये बोरिंगच्या किंवा टँकरच्या पाण्यावर नाममात्र थातुरमातुर प्रक्रिया करून, ते बाटल्यांमध्ये भरले जाते. शहरात असे २०हून अधिक प्रकल्प सुरू असल्याचे सांगण्यात येते. यातील बहुतांश प्रकल्पांकडे केंद्रीय अन्न व औषध प्रशासनाची परवानगी नाही. अन्नसुरक्षा कायद्यानुसार पाण्याची गुणवत्ता प्रयोगशाळेत तपासणे बंधनकारक असतानाही, या प्रकल्पातील पाण्याची तपासणी केली जात नसल्याचे सांगण्यात येते. केवळ व्यावसायिक परवाना काढून शहरात हा व्यवसाय केला जात आहे.

बाटलीबंद पाणी सीलबंद असले, तरी ते कोणत्या कंपनीचे आहे? कोणत्या ठिकाणी, भरण्यात आले? त्याचा वापर कधीपर्यंत करता येऊ शकतो? अशी कोणतीही माहिती त्यावर नसते. त्यामुळे पाण्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. परिणामी, नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. या पाण्यामुळे एखादा अनुचित प्रकार घडल्यानंतर प्रशासनाला जाग येणार का, असा सवाल जागरूक नागरिक उपस्थित करत आहेत.

- पाण्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह
- आरोग्य धोक्यात येण्याची भीती
- उन्हाळ्यातील पाणीटंचाईमुळे नागरिकांचे हाल



### एफडीएचा अजब दावा

मिरा-भाईंदरमध्ये बेकायदा सुरू असलेल्या बाटलीबंद पाण्याच्या विक्रीसंदर्भात अन्न व औषध प्रशासनाचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न 'मटा'ने केला. त्यावर 'या पाण्याची खुल्या पद्धतीने विक्री केली जात असल्याने त्याची जबाबदारी पालिकेची नाही. त्यांच्याकडूनच अधिकची माहिती प्राप्त होईल,' असे अजब उत्तर संबंधित अधिकाऱ्यांनी दिले. शहरातील मिठाई विक्रेत्यांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या प्रकरणांकडे एफडीएने याआधीही दुर्लक्ष केले होते.

### असा चालतो व्यवसाय

या प्रकल्पांतून बाटलीबंद पाण्याच्या बाटल्या ग्राहकांना विक्री करण्यासाठी टेम्पोद्वारे दुकानांमध्ये पुरवल्या जातात. अशा बेकायदा प्रकल्पांतील पाणी टेम्पोचालक आठ ते दहा रु. प्रति २० लीटर एवढ्या अल्पदरात विकत घेतात आणि २५ रुपयांपर्यंतच्या किमतीत दुकानदारांना विकतात. दुकानदार ग्राहकांना ४० रुपयांना त्याची विक्री करतात. नफा मिळत असल्याने व्यावसायिक अशा स्थानिक, विनापरवाना कंपन्यांचे पाणी अधिक प्रमाणात दुकानांत ठेवतात.

पुढारी पान क्र.3

# पैसे डबल करण्याच्या नादात ३० लाखांची फसवणूक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर येथे राहणाऱ्या स्टील व्यापाऱ्याला पैसे डबल करून देण्याचे आमिष दाखवून ३० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यातील एका आरोपीला अटक केली आहे.

भाईंदर पश्चिम येथे राहणारे रवि कांतीलाल मेहता (४५) हे स्टील व्यापारी व जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांच्या जमीन खरेदी विक्री व्यवसायामध्ये जमीनीचे कागदपत्रांचे काम भुषण मांडवकर हा पाहतो. भूषण याने मेहता यांना सांगितले की त्याच्या मित्राने एक स्कीम सांगितली असून ती चांगली आहे. त्या स्कीममध्ये पहिल्यादा ५ लाख रुपये दयायचे ते पैसे दिल्यानंतर ते एक पे बाय नियर वॉलेट हे स्पेन देशाचे वॉलेट ओपन करून त्यामध्ये गुंतवणूक करतात. तसेच २५ लाख त्यांना कॅश द्यावे लागतात. त्याबदल्यात ते दुसऱ्या दिवशी ५४ लाख रुपये आपल्याला देणार आहेत. मेहता यांना ही स्कीम आवडल्यामुळे त्यांनी भूषण याच्या मित्रांना भेटण्यास बोलावले. त्यानंतर मेहता यांना भाईंदर येथे येऊन भेटले. त्यांनी स्कीम समजावून सांगितली. त्यावेळी भुषण मांडवकर, संतोष जनार्दन धुलप, विकास घाटाळ, करण रझोश ऊर्फ सोनु, राहुल गायकवाड हे भेटले. त्यापैकी करण रझोरा ऊर्फ सोनु, राहुल गायकवाड हे दोघे हे काम करत असल्याचे सांगितले. त्यानंतर दोन दिवसांनी मेहता यांनी करण, व राहुल या दोघांना ५ लाख रुपये दिले. व २५ लाख रुपये देतो असे सांगितले. त्या दोघांनी मेहता यांचे दुसरे दिवशी पे बाय नियर वॉलेट अकाऊंट उघडले. त्यानंतर या दोघांनी ३० लाखाची फसवणूक केल्यामुळे भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी तपास करून करण रजोरा याला अटक केली आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पान क्र.5

दि. 29/04/2023

लोकमत महामुंबई पान

# रेल्वेच्या कारवाईला न्यायालयाची स्थगिती

## ३ हजारांहून अधिक कुटुंबांना दिलासा

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

विरार पूर्वेला असलेल्या जीवदानी पाडा, अण्णापाडा, आंबेडकर नगर या परिसरात रेल्वेच्या जागेत राहणाऱ्या ३ हजारांहून अधिक कुटुंबांना पश्चिम रेल्वेने २५ एप्रिल ते २९ एप्रिलपर्यंत तोडक कारवाई करून जमीन खाली करण्यात येणार होती. या कारवाईविरोधात फुले-आंबेडकर झोपडपट्टी बचाव संघर्ष समितीने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. यावेळी समितीच्या वतीने वकील दिलीप शिंदे, वरिष्ठ वकील किशोर पाटील, तसेच वकील नितीन भोईर यांनी युक्तिवाद केला. यावेळी न्यायाधीश जी एस पटेल आणि नीला गोखले यांनी संघर्ष समितीची बाजू ऐकत रेल्वेच्या तोडक करवाईवर ४ मे २०२३ पर्यंत स्थगिती दिली आहे. यामुळे ३००० हुन अधिक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या लढाईत समाजसेवक प्रसेनजीत इंगळे यांनी महत्वाची भूमिका बजावली असून त्याच बरोबर स्थानिक नागरिक सिद्धार्थ खंदारे, मॅथ्यू वर्गीस, बाळा वंगीरी,सुरेश निर्था, पतीराम यादव, किटू करपते, रोहित यांनी मोलाचे योगदान दिले. स्थानिक आमदार हितेंद्र ठाकूर यांनी नागरिकांच्या वतीने न्यायालयाचा सर्व खर्च उचलला तर माजी नगरसेवक महेश पाटील, संजीव पिंगुळकर, नरेंद्र पाटील, प्रफुल साने, माया चौधरी, डॉ. दिनेश कांबळे यांनी नागरिकांना सहकार्य केले, त्याच बरोबर आगरी सेना प्रहार, शिवसेना शिंदे गट, वंचित बहुजन विकास आघाडी, काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी नागरिकांच्या आंदोलनाला समर्थन दिले होते.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण

**नालासोपारा :** येथे १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची घटना समोर आली आहे. विशाल पांडे नगर परिसरात राहणारी अल्पवयीन मुलगी बुधवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास शेजाऱ्यांचा मोबाइल घेतला म्हणून आई रागावली या कारणाने कोणाला काहीही न सांगता घर सोडून निघून गेली होती. तिचा सर्वत्र शोध घेऊनही ती न सापडल्याने तिचे आरोपीने कशाचे तरी आमिष दाखवून सोबत पळवून नेल्याचा संशय आल्याने मुलीच्या आईने गुरुवारी पेल्हार पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

तर वसईत दोन महिलांचा विनयभंग झाल्याची घटना घडली आहे. ऋषिकेश हॉटेलजवळील गल्लीत एक बार आहे. या बारजवळ वसई येथील एका ५२ वर्षीय महिला व तिच्या मैत्रिणीचा बुधवारी रात्री साडेआठच्या सुमारास दोन जणांनी अश्लील शिवीगाळ केली.

लोकमत पू. पान क्र.4

# मंजूर कोट्यानुसार पाणी द्या; अन्यथा आंदोलन : गीता जैन

## इशारा दिल्यानंतर मीरा-भाईंदर शहराच्या पुरवठ्यात सुधारणा

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** स्टेम व एमआयडीसीकडून मंजूर कोट्यानुसार पाणीपुरवठा केला जावा, अन्यथा आंदोलनाशिवाय पर्याय नसेल असा इशारा आमदार गीता जैन यांनी दिला आहे. आमदारांच्या इशाऱ्यानंतर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होत आहे.

याबाबत स्टेम व एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना महापालिकेत बोलावून आमदार गीता जैन यांच्यासह पालिकेचे माजी पदाधिकारी, अधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी अन्य शहरांना जास्त पाणी व मीरा-भाईंदरला कमी पाणी दिले जाते, बेकायदेशीर जोडण्या घेण्यात आल्या आहेत, आदी आरोप करण्यात आले. त्यात स्टेमचे संचालक संकेत घरत यांनी तूट वगळून ८० दशलक्ष लिटर पाणी रोज देण्याचे प्रयत्न असल्याचे आश्वस्त केले. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी मात्र ठोस आश्वासन दिले नाही.

### आधीच पाणी कमी, त्यात पुरवठा खंडित

एमआयडीसीकडूनदेखील १२५ दशलक्ष लिटर पाणी मंजूर असल्याचे पालिका सांगत असली, तरी प्रत्यक्षात त्यांच्याकडूनही कमी पाणीपुरवठा होतो. स्टेम आणि एमआयडीसीकडून गेल्या अनेक वर्षांपासून मंजूर कोट्यापेक्षा कमी पाणी दिले जात आहे. आधीच पाणी कमी, त्यात विविध कारणांनी पाणीपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वाढले आहेत. शहराचा पाणीपुरवठा खंडित होऊन कमी दाबाने व पाणीपुरवठा करण्याच्या तासात वाढ झाल्याने नागरिकांना पाणी समस्येला सामोरे जावे लागत आहे.

स्टेम प्राधिकरणाकडून ८६, तर एमआयडीसीकडून १२५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा मंजूर आहे. त्यानुसार २११ दशलक्ष लिटर पाणी शहरास मिळणे आवश्यक आहे. मात्र, शहरास १८५ ते १९० दशलक्ष लिटरच पाणी मिळत असल्याचा मीरा-भाईंदर पालिकेचा दावा आहे, तर स्टेमकडून अंजूर फाटा येथील मीटरनुसार पाणी मोजले जात आहे. तिथून शहरात चेणे येथे महापालिकेने बसवलेल्या मीटरपर्यंत पाणी येईपर्यंत २२ किमीचे अंतर असून त्यादरम्यान १० ते १२ दशलक्ष लिटर पाणी कमी असल्यामुळे शहरास स्टेमकडून ७४ दशलक्ष लिटरच्या आसपास पाणी मिळते.

Scanned with CamScanner

दि. 29/04/2023

लोकमत पू. पान क्र. 1

# वसईतील रिक्षा चोरट्यांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**भिवंडी :** शहरात दुचाकी व रिक्षा चोरीच्या घटनांत वाढ होत असतानाच भिवंडी गुन्हे शाखा युनिट दोनकडून दुचाकी व रिक्षा चोरी करणाऱ्या दोघा चोरट्यांना गुरुवारी अटक केली आहे.

नारपोली पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोटारसायकल चोरी करणारे दोन संशयित वंजारपट्टी नाका येथे येणार असल्याची माहिती भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन गायकवाड यांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिस पथकाने सापळा रचून श्रीकांत बाळू बागरवार (वय २७), निशांत मंगेश हुकमाळी (वय २३) या दोघांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. त्यांच्या ताब्यातून चोरी केलेल्या सहा रिक्षा, एक दुचाकी अशी तीन लाख १५ हजारांची वाहने जप्त केली आहेत. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत या दोघांनी वसई येथील फरार गुन्हेगार आकाश जयवंत पाटील यांच्या सोबतीने वसई परिसरातील या रिक्षा चोरी केल्याची कबुली दिली.

पुण्यनगरी पू. पान क्र. 1

# शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली पालिका आयुक्तांची भेट



**। नालासोपारा :** वसई-विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध समस्यांबाबत पालिका आयुक्त अनिल पवार यांच्यासोबत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी तब्बल दोन तास चर्चा केली. महानगरपालिका करत असलेल्या नियोजनाबाबत व भविष्यात वाढीव पाणी मिळण्याबाबत उपाययोजना करण्यात येत आहेत. एमएमआरडीएकडून मिळणाऱ्या वाढीव पाण्याच्या कामाबाबत सविस्तर माहिती आयुक्तांनी दिली. जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत हे पाणी वसई-विरारकरांना मिळणार आहे. तसेच वारंवार वीजपुरवठा खंडित होतो, यावरदेखील उपाययोजना करण्याच्या सूचना करण्यात आल्या. बाजार करवसुलीमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराबाबत व फेरीवाल्यांच्या वाढत्या संख्येबाबत चर्चा करून कारवाई करण्याबाबत सांगण्यात आले. त्याचबरोबर पावसाळ्यापूर्वी करण्यात येणाऱ्या नालेसफाईबाबत देखील सविस्तर चर्चा करण्यात आली. नैसर्गिक नाल्याच्या बाजूला झालेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले. याचबरोबर शिंदे सरकारची आपला दवाखाना ही योजना महापालिका कार्यक्षेत्रात राबवण्यात येणार असल्याचे आयुक्त पवार यांनी सांगितले. त्याचा शुभारंभ लवकरच करण्यात येणार आहे.

या वेळी अतिरिक्त आयुक्त मनाले, अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे, नगररचना विभागाचे वाय. एस. रेड्डी, अभियंता पाचंगे तसेच पाणी विभागाचे ठाकरे उपस्थित होते. शिवसेनेच्या वतीने लोकसभा समन्वयक नवीन दुबे, वसई तालुकाप्रमुख सुदेश चौधरी, उपजिल्हाप्रमुख जितेंद्र शिंदे, दिवाकर सिंग अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाप्रमुख सलीम आर खान, उपतालुकाप्रमुख अजित खांबे, विरार शहरप्रमुख उमेश गोवेकर तसेच विरार शहर महिला आघाडी संघटक शिंदे उपस्थित होत्या.

# गॅस पाइपलाइन फुटल्याने भीतीचे वातावरण

## भुयारी गटाराच्या खोदकामावेळी घडली घटना



**। मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या शिवसेना गल्लीजवळ रस्त्याच्या मधोमध भुयारी गटारासाठी खोदकाम सुरू असताना महानगर गॅस पाइपलाइन अचानक फुटल्याने रस्त्यावरून जाणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

भाईंदर पश्चिमेला महापालिकेकडून गेल्या काही दिवसांपासून भुयारी गटार योजनेचे काम सुरू आहे. भुयारी गटार योजनेचे काम ठेकेदाराकडून केले जात आहे. ठेकेदाराकडून काम करत असताना काळजीपूर्वक गटार खोदणे आवश्यक आहे. परंतु ठेकेदाराने निष्काळजीपणे रस्त्याच्या मधोमध खोदकाम करून सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना केलेली दिसत नाही. त्यामुळे नेहमीच या रस्त्यावर वाहतूक कोंडी झालेली असते. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. याकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. त्यातच शुक्रवारी दुपारी जेसीबीच्या साहाय्याने खोदकाम करत असताना महानगर गॅस पाइपलाइन फुटली. या वेळी पाइप फुटून गॅस बाहेर पडल्याने कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी वाहतूक पोलिसांनी घटनास्थळापासून दूरवर रस्त्यावरून येणारी वाहने थांबवली होती. या वेळी पाइपलाइनमधून गॅस उंचावर उडत होता. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

अपघातानंतर तुटलेल्या पाइपलाइनमधून बाहेर पडणारा गॅस थांबवण्यासाठी जेसीबीचालकाने तुटलेल्या जागेवर ओला चिखल टाकून काही काळ गॅस बाहेर येण्यापासून रोखला. गॅस पाइपलाइन फुटल्याने काही काळ इमारतीमधील रहिवाशांना पुरवठा करणारा गॅस बंद करण्यात आल्याचे सांगितले जाते. तुटलेली पाइपलाइन दुरुस्त करण्याचे काम सुरू होते.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पान क्र.15 दि.29/04/2023

## पोलिसांचे सागरी सुरक्षा अभियान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसईः** सागरी सुरक्षेच्या दृष्टीने मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय यांच्यामार्फत सागरी सुरक्षा अभियान राबविण्यात आले होते. समुद्रमार्गाने होणाऱ्या हालचाली व किनारपट्टीच्या भागात लक्ष ठेवण्यासाठी विशेष पथके स्थापन करून तपासणी करण्यात आली.

वसई विरार तसेच मीरा भाईंदरच्या पश्चिम भागाला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. किनारपट्टीच्या भागात मासेमारी करणारे नागरिक व व्यावसायिक राहतात. समुद्रकिनारी पर्यटकही येत असतात. यासाठी सागरी सुरक्षा तितकीच महत्त्वाची आहे. गुरुवारपासून सागरी सुरक्षा अभियान हा उपक्रम हाती घेतला होता. यामध्ये वाहतूक करणाऱ्या वाहनांची व संशयित इसमांची कसोशीने तपासणी करण्यात आली.

## मीरा-भाईंदरच्या मेट्रो कामाची गती वाढवा

### उपमुख्यमंत्र्यांचे आदेश

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर मेट्रो प्रकल्पाचे काम मुदत कालावधीनुसार दीड वर्ष उशिराने सुरू असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे याबाबत उपमुख्यमंत्र्यांनीच खंत व्यक्त केली असून कामाची गती वाढवण्याचे आदेश एमएमआरडीएच्या आयुक्तांना दिले आहेत.

मेट्रो कामाची निविदा २०१८ रोजी काढण्यात आली असून प्रत्यक्षात ९ सप्टेंबर २०१९ पासून कामास सुरुवात झाली आहे. या प्रकल्पाचा १०.५४ किलोमीटरचा प्रवास असून याला दहिसर-मीरा भाईंदर मेट्रो मार्ग ९ असे नाव देण्यात आले आहे. साधारण सहा हजार सहाशे सात कोटी रुपये खर्च केले जात आहेत. हे काम एमएमआरडीए विभागामार्फत होत असले तरी या कामाचे कंत्राट ह्राजे पी इन्फ्रा या कंपनीला देण्यात आले आहे. त्यानुसार गेल्या साडेतीन वर्षांपासून मेट्रो मार्गिकेचे काम सुरू असून मेट्रोच्या कारशेडवरून वादंग निर्माण झाला आहे.

२२ एप्रिल रोजी विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मीरा भाईंदरमध्ये आले होते. यावेळी शहराअंतर्गत प्रवास करत असताना त्यांनी मेट्रोच्या कामाची देखील पाहणी केली. यात मेट्रोचे काम उशिराने सुरू असल्याचे त्यांच्या निदर्शनात आले. म्हणून याबाबत माहिती घेण्यासाठी त्यांनी एमएमआरडीएशी फोनद्वारे चर्चा केली. यावेळी मेट्रोचे काम हे दीड वर्ष उशिराने सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे या कामाची गती वाढवण्यात यावी, असे आदेश आपण दिले असल्याची माहिती उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत दिली.

## भूमिपुत्रांच्या समस्या सोडविण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

### आगरी सेनेच्या कार्यकर्त्यांची राजशिष्टाचार मोडून भेट

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरारमधील स्थानिक भूमिपुत्रांच्या विविध समस्या सोडविण्याचे तसेच वसईतील घोटाळ्यांची चौकशी करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वसईत आले असताना आगरी सेनेने त्यांची भेट घेतली. या वेळी नियोजित कार्यक्रमातील राजशिष्टाचार तोडून शिंदे यांनी शिष्टमंडळाची भेट घेतली.

विविध घोटाळे, नैसर्गिक नाले बुजवून केलेला भराव, एफएसआय घोटाळा आदीबाबत लढाई सुरू आहे. मात्र शासकीय दरबारी भूमिपुत्रांना न्याय मिळत नाही. यामुळे आगरी सेनेचे अध्यक्ष कैलास पाटील यांनी गुरुवारी मुख्यमंत्री एकनाश शिंदे यांची वसईतील एका कार्यक्रमात भेट घेतली. तुंगारेश्वर येथे सदानंद महाराजांच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री आले असताना आगरी सेनेच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्र्यांनी राजशिष्टाचार मोडून आंदोलक कार्यकर्त्यांची भेट घेतली. स्थानिकांना जिल्ह्यातील कंपन्यांमध्ये नोकरी देणे, अमूल डेअरी, जीएम ब्रेव्हरीज, नवनीत प्रकाशन आदी मोठ्या कंपन्यांमध्ये नोकरी देणे, पालघर येथील पंचम कोळंबी प्रकल्पात स्थानिक महिलांना देणे, वसईतील स्विचिंग स्टेशनची चौकशी करून अतिउच्चदाब केंद्रे बांधावीत अशी मागणी करण्यात आली. याशिवाय विरारच्या बोळींज येथील चोरलेल्या रस्त्याची चौकशी, एमएमआरडीएच्या स्वस्त घरांचा घोटाळा, डोंगरी येथील जमीन लाटल्याचे प्रकरण स्मार्ट सिटीमध्ये बांधलेल्या नैसर्गिक नाल्यावर केलेल्या भरावाची चौकशी करावी अशा मागण्या करण्यात आल्या.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पान क्र.15 दि. 29/04/2023

# अनधिकृत शाळांना पायबंद

## वसई, विरार शहरात १२७ अनधिकृत शाळा, सर्वेक्षण करून कारवाई करणार

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** वसई विरार शहरात उभ्या राहणाऱ्या अनधिकृत शाळांना पायबंद घालण्यासाठी शिक्षण विभागाची मोहीम अधिक तीव्र सुरू आहे. आतापर्यंत १२७ अनधिकृत शाळांची यादी जाहीर करण्यात आली असून यंदाच्या वर्षी पुन्हा एकदा अनधिकृत शाळा तपासणीसाठी सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

वसई, विरार शहराचे वेगाने नागरीकरण वाढू लागले आहे. या नागरीकरणासोबतच अनधिकृत शाळा उभ्या करण्याचे प्रमाणही वाढत आहे. विशेषतः शहरातील दाटीवाटीच्या भागात कोणत्याही प्रकारची परवानगी न घेताच शाळा चालविल्या जात आहेत. यामुळे विद्यार्थी व पालक यांची फसवणूक होत असते. विशेषतः शाळांना इंग्रजी शाळांची नावे दिली जात आहेत, जेणेकरून या शाळा कॉन्व्हेंट असल्याचे भासविले जाते. तर काही ठिकाणी धोकादायक असलेल्या ठिकाणीही शाळा भरविल्या जातात. मागील काही वर्षांपासून अनधिकृत शाळांचा प्रकार अधिकच वाढत आहे. त्यामुळे शिक्षण विभागाकडून अनधिकृत शाळांची शोधमोहीम हाती घेऊन यादी प्रसिद्ध करून कारवाई केली जाते. यंदाच्या वर्षी पुन्हा एकदा शैक्षणिक वर्षाची सुरुवात होण्याआधीच अनधिकृत शाळांची शोधमोहीम सुरू केली आहे. यात शाळा बंद करण्याच्या नोटिसा, पालक वर्गात जनजागृती, गुन्हे दाखल करणे अशा कारवाया सुरू केल्या असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे. शहरात अनधिकृत शाळा उभ्या राहिल्या नाही पाहिजे यासाठी वरिष्ठ स्तरांवरून सक्त कारवाईच्या सूचना शिक्षण विभागाला देण्यात आल्या आहेत.

### गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरूच

वसईत १२७ शाळा अनधिकृत असल्याचे समोर आले होते. आतापर्यंत तीसहून अधिक शाळांच्या संचालकांवर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले, तर २० शाळा बंद करण्यात आल्या आहेत. कारवाईनंतर काही शाळांनी मान्यता घेण्यास सुरुवात केली आहे, तर काहींना इरादापत्र मिळाले आहे. वसई तालुक्यातील स्वामी विवेकानंद सेंट, झेवियर ॲन्ड मेरी कॉन्व्हेंट स्कूल, कुमर मेरी पब्लिक स्कूल, शांतिनिकेतन विद्यालय, वसई, लॉर्ड्स इंग्लिश स्कूल, गॉड ब्लेस स्कूल, चिल्ड्रन वेल्फेअर स्कूल, पोल स्टार इंग्लिश स्कूल, मोहम्मदी उर्दू प्रायमरी स्कूल, शारदा निकेतन, शारदा विद्यामंदिर आदी शाळांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### कारवाई अधिकच तीव्र होणार

अनधिकृत शाळांना रोखण्यासाठी शिक्षण विभाग अधिकच सक्रिय झाला आहे. शहरात ज्या अनधिकृत शाळा आढळून येतील त्यांच्यावर नोटिसा देऊन गुन्हे दाखल केले जाणार आहेत. याशिवाय ज्या आस्थापनेत या शाळा चालविल्या जात आहेत त्या संस्थांवर देखील बडगा उगारला जाणार आहे.

### नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन

वाढत्या नागरीकरणामुळे शहराचा आवाका अधिकच वाढला आहे. विशेषकरून अनधिकृतपणे उभ्या राहत असलेल्या चाळी, गाळे अशा ठिकाणी अनधिकृत शाळा सुरू केल्या जात आहेत. त्यामुळे ज्या भागात अनधिकृत शाळा उभ्या राहत असतील त्याची माहिती शिक्षण विभागाला कळविण्यात यावी, असे आवाहन नागरिकांना शिक्षण विभागाने केले आहे.

सकाळ पान क्र. 11

# तक्रार नसली तरी गुन्हे दाखल करावेत

## द्वेषमूलक भाषणांप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

नवी दिल्ली, ता.२८ (पीटीआय) : द्वेषमूलक, चिथावणीखोर भाषणाप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने आज पुन्हा विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना धारेवर धरले. एखाद्या ठिकाणी या प्रकरणात तक्रार दाखल झाली नसली तरीसुद्धा संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात यावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने विविध राज्यांना दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने २०२२ मध्ये देण्यात आलेल्या आदेशांची व्याप्ती आणखी वाढविली आहे. न्या. के. एम जोसेफ आणि न्या. बी.व्ही. नागरत्ना यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले. द्वेषमूलक भाषणे हा गंभीर गुन्हा असून त्यामुळे देशाच्या धर्मनिरपेक्ष चौकटीवर परिणाम होऊ शकतो असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदविले. २१ ऑक्टोबर २०२२ रोजी दिलेल्या आदेशांचा कोणत्याही एका विशिष्ट धर्माच्या अनुषंगाने विचार करता कामा नये, या प्रकरणामध्ये गुन्हे दाखल करण्यास यंत्रणेकडून विलंब झाला तर तो न्यायालयाचा अवमान समजला जाईल, असे न्यायालयाने ताज्या आदेशांत म्हटले आहे.



धर्माच्या नावाखाली आपण कोठे येऊन पोचलो आहोत? ज्या पातळीवर धर्माला आणून ठेवण्यात आले आहे ते खरोखरच दुर्दैवी आहे असे सांगतानाच न्यायालयाने उत्तरप्रदेश, दिल्ली आणि उत्तराखंड सरकारला अशाप्रकारची द्वेषमूलक भाषणे करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यास बजावले. धर्मनिरपेक्ष देशासाठी ही बाब खूप धक्कादायक आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायाधीश हे अराजकीय असतात त्यांना कोणत्याही राजकीय पक्षाशी काहीही देणेघेणे नसते. त्यांच्या डोक्यामध्ये केवळ देशाची राज्यघटना असते. जनतेचे व्यापक हित लक्षात घेऊन आणि कायद्याच्या राज्याच्या प्रस्थापनेसाठी आम्ही याबाबतच्या याचिकांवर सुनावणी घेत आहोत असे न्यायालयाकडून सांगण्यात आले.

### ...तर तो आमचा अवमान

आमच्या आदेशानंतर देखील यंत्रणेकडून गुन्हे दाखल करण्यात टाळाटाळ केली जात असेल तर तो न्यायालयाचा अवमान ठरेल, असा इशारा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. याबाबतची याचिका पत्रकार शाहीन अब्दुल्ला यांनी दाखल केली आहे. द्वेषमूलक भाषणे करणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिल्ली, उत्तरप्रदेश आणि उत्तराखंड सरकारला द्यावेत अशी मागणी त्यांनी न्यायालयाकडे केली होती.

Scanned with CamScanner